अखिल भारतीय सेवा (कार्य मुल्यांकन अहवाल) नियम २००७ प्रमाणे भारतीय वनसेवेतील अधिकाऱ्यांनी करुन घ्यावयाच्या वैद्यकीय तपासण्यांबाबत (सन २०१५-१६)

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्रमांकः एएफओ-१११६/प्र.क्र.३०/फ-७,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

तारीख: १८ जानेवारी, २०१६

प्रस्तावना

अखिल भारतीय सेवा (कार्य मुल्यांकन अहवाल) नियम २००७ हे नियम भारतीय वनसेवेतील अधिकाऱ्यांसाठी, सन २००८-०९ या वर्षापासून लागू करण्यात आलेले आहेत. या नियमाप्रमाणे ४० वर्षे वयावरील वयाच्या भारतीय वनसेवेतील अधिकाऱ्यांनी त्यांच्या वैद्यकीय तपासण्या, ठरवून दिलेल्या नमुन्यात, प्रतिवर्षी करुन घेणे बंधनकारक असून, त्यांचे वैद्यकीय तपासणीच्या अहवालाचा सारांश, वार्षिक कार्यमूल्यांकन अहवालासोबत जोडणे आवश्यक आहे. सन २०१५-१६ या वर्षाकरिता महाराष्ट्र संवर्गातील भारतीय वनसेवेतील अधिकाऱ्यांच्या वैद्यकीय चाचण्या करण्यासंबंधी शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे:-

शासन निर्णय

अखिल भारतीय सेवा (कार्यमूल्यांकन अहवाल) नियम, २००७ मधील नियम ३ व त्यासोबतचा नमुना ४ अनुसार, वयाच्या ४० वर्षावरील भारतीय वनसेवेतील अधिकाऱ्यांनी त्यांच्या विहित वैद्यकीय तपासण्या चालू वर्षी सोबतच्या प्रपत्र “अ” मध्ये नमूद केल्यानुसार

महसूल विभागनिहाय मान्यताप्राप्त खाजगी रुग्णालयातून करुन घ्याव्यात. सदर वैद्यकीय तपासणी करताना पुढील सूचना अंमलात आणाव्यात.

१) महाराष्ट्र राज्य संवर्गातील दि. ३१ मार्च, २०१५ रोजी ४० वर्षे किंवा अधिक वय असलेल्या भावसे अधिकाऱ्यांनी ते कार्यरत असलेल्या महसूल विभागातील प्रपत्र “अ” मध्ये दर्शविलेल्या खाजगी रुग्णालयातून / वैद्यकीय संस्थामधून प्रपत्र “ब” मध्ये नमूद केलेल्या सर्व वैद्यकीय तपासण्या चालू वर्षी (२०१५-१६) करुन घ्याव्यात.

२) अमरावती विभागात कार्यरत असलेल्या भावसे अधिकाऱ्यांनी त्यांना जवळ असणाऱ्या व प्रपत्र “अ” मध्ये नमूद केलेल्या इतर महसूल विभागातील रुग्णालयांतून सदर वैद्यकीय तपासण्या करुन घ्याव्यात. तसेच सदर वैद्यकीय तपासण्या करण्याची सुविधा उपलब्ध असलेल्या राज्यातील जिल्हा शासकीय रुग्णालये अथवा महसूल विभागातील शासकीय / महानगरपालिका रुग्णालयांमध्ये देखील या वैद्यकीय तपासण्या करुन घेता येतील.

३) भारतीय वनसेवेतील अधिकाऱ्यांनी सदरील आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून ३१ मार्च, २०१६ पर्यन्त संबंधित रुग्णालयाशी परस्पर संपर्क साधून, तपासण्यांकरिता तारखा निश्चित करुन घ्याव्यात व परस्पर प्रपत्र “ब” मधील सर्व वैद्यकीय चाचण्या करुन घ्याव्यात.

४) शासनाने वैद्यकीय तपासणीसाठी मान्य केलेल्या प्रपत्र “अ” मध्ये दर्शविलेल्या रुग्णालयांनी तसेच शासकीय किंवा महानगरपालिका रुग्णालयांनी अधिकाऱ्यांच्या वैद्यकीय तपासणीचा एकत्रित अहवाल, सोबतच्या प्रपत्र “ब” मधील नमुन्यात तपासण्या पूर्ण झाल्यानंतर आठ दिवसांच्या आत अवर सचिव,

महसूल व वन विभाग, दालन क्रमांक ४६०, चौथा मजला, मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०००३२ (कार्यासन फ-७) येथे सादर करणे आवश्यक राहील. तसेच त्याची एक प्रत संबंधित भावसे अधिकाऱ्यांनाही द्यावी.

५) प्रपत्र “ब” मध्ये दर्शविलेल्या सर्व वैद्यकीय तपासण्या एकाच ठिकाणी व एकाच दिवशी करण्यात येतील. परंतु अपवादात्मक प्रकरणी काही कारणास्तव सर्व तपासण्या एका दिवसात करणे शक्य न झाल्यास लगतच्या दुसऱ्या दिवशी त्या करुन घ्याव्यात. अधिकारी आणि संबंधित रुग्णालये यांनी तपासणीचा दिनांक व वेळ परस्पर ठरवून घ्यावा. तसेच तपासण्यांसाठीची पूर्वतयारी / आवश्यक खबरदारी सुध्दा (preparation) रुग्णालयाच्या सल्ल्याने घ्यावी.

६) वैद्यकीय तपासण्यांचा १ दिवस हा कालावधी तसेच काही अपरिहार्य कारणास्तव लगतच्या दुसऱ्या दिवशी वैद्यकीय तपासण्या पूर्ण करणे आवश्यक असल्यास अशा दोन्ही दिवसाचा कालावधी कर्तव्यकाळ म्हणून समजण्यात येईल.

७) वैद्यकीय तपासण्यांचा कालावधी हा कर्तव्यकाळ समजल्यामुळे, भारतीय वनसेवेतील अधिकारी अन्यथा दौऱ्यावर असतांना, त्यांना ज्या दराने प्रवासभत्ता/दैनंदिन भत्ता दिला जातो त्या दराने तो (लागू असल्यास) देय राहील. असा प्रवास भत्ता / दैनिक भत्ता यांचे दर, वित्त विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार देय राहतील. याबाबतची परिगणना संबंधित वेतन प्रदान करणाऱ्या कार्यालयाने करुन त्यांचे प्रदान करावे.

८) वैद्यकीय तपासणीस जाण्यापूर्वी अधिकऱ्यांनी, त्यांच्या लगतच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना ते सदर तपासणीसाठी मुख्यालयात अथवा मुख्यालयाबाहेरील रुग्णालयामध्ये जाणार असल्याबाबतची पूर्वकल्पना देणे आवश्यक राहील.

९) भावसे अधिकाऱ्यांनी त्या त्या महसूल विभागासाठी नेमलेल्या रुग्णालयातून अथवा शासकीय किंवा महानगरपालिका रुग्णालयांमधून प्रपत्र “ब” मध्ये दर्शविलेल्या सर्व वैद्यकीय तपासण्या करुन घ्याव्यात. रुग्णालयाला वैद्यकीय तपासण्यांसाठी आवश्यक असलेली रक्कम प्रथम स्वत: अदा करावी. शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र. एमएजी-१०९८/प्र.क्र.२२०/आरोग्य-३, दि. ३१ ऑगस्ट, २००६ अन्वये दर दोन वर्षातून एकदा वैद्यकीय तपासण्यांवरील खर्चाची प्रतिपूर्ती यापुढे देय राहणार नाही. या शासन निर्णयानुसार वैद्यकीय तपासण्यांपोटी अनुज्ञेय खर्चाची पूर्तता संबंधित अधिकाऱ्यांना त्यांच्या कार्यालयातून प्राप्त करुन घेण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१०) यावरील खर्च संबंधित अधिकाऱ्यांच्या आस्थापनेवरील वेतन व भत्त्यासाठी लागू असलेल्या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो त्या त्या वर्षासाठीच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. मात्र यासाठी आर्थिक वर्षाचे बंधन राहणार नाही.

हे आदेश वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक-१२/सेवा-५, दिनांक २२ जानेवारी, २०१५ अन्वये प्राप्त सहमती अन्वये निर्गमित करण्यात येत आहेत. सदर सहमती देताना वित्त विभागाने अखिल भारतीय सेवा (कार्यमुल्यांकन अहवाल) नियम, २००७ अन्वये भारतीय वनसेवेतील अधिकाऱ्यांना वैद्यकीय तपासणी ही बंधनकारक (mandatory) असल्याने वनविभागाने प्रत्येक वर्षी वित्त विभागाच्या सहमतीकरीता प्रस्ताव सादर

करण्याची आवश्यकता नसून यापुढे सामान्य प्रशासन विभागाने भा.प्र.से. च्या अधिकाऱ्यांकरिता निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार वन विभागाच्या स्तरावर या प्रस्तावास मान्यता द्यावी असे निर्देश दिले आहेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०९२९१००९५७५९१९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vidya Ramappa Hampayya

Digitally signed by Vidya Ramappa Hampayya
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Undersecretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=a94ef1b631f4673b829ac9adbeb5b0ddabd086a7544e3fdf47cd7a011ff7ea40, cn=Vidya Ramappa Hampayya
Date: 2016.01.18 13:36:38 +05'30'

(विद्या हम्पय्या)
शासनाचे अवर सचिव

प्रत तातडीच्या आवश्यक कार्यवाहीकरिता,

- महाराष्ट्र संवर्गातील ४० वर्ष वयावरील भारतीय वनसेवेतील अधिकारी द्वारे प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर

प्रत माहितीसाठी,

- महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य-१, मुंबई
- महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र राज्य-१, मुंबई
- महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य-२, नागपूर
- महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र राज्य-२, नागपूर
- प्रधान सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय
- प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
- अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
- सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,

- प्रपत्र-अ मधील सर्व रुग्णालये
- सहाय्यक संचालक (भावसे लेखा), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
- निवडनस्ती, फ-७

शासन निर्णय क्रमांकः एएफओ-१११६/प्र.क्र.३०/फ-७, दिनांक १६ जानेवारी, २०१६ चे सहपत्र

प्रपत्र-अ

अ.क्र.	विभाग आणि त्याखालील जिल्हे	भावसे अधिकाऱ्यांची तपासणी करुन घेण्याकरिता निश्चित केलेले रुग्णालयाचे नाव व संपर्क अधिकारी व दूरध्वनी क्रमांक	
		रुग्णालयाचे नाव	संपर्क अधिकारी व दूरध्वनी क्रमांक
१.	**मुंबई / कोकण विभाग** मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग	**दि अपोलो क्लिनिक, कुलाबा,** मुंबई	**डॉ. हिरल मनियार** Hosp.-२२-२२०२११६६ Mob-८४५०९८२२२५
२.	**पुणे विभाग** सांगली, सातारा, पुणे, कोल्हापूर, सोलापूर	**रुबी हॉल क्लिनिक,** ४०, ससून रोड, पुणे-४११ ००१	**श्रीमती हंसा कोटक, वरीष्ठ व्यवस्थापक, वैद्यकीय सेवा** Mob.:-९४२२३१०५०५ Hos.-०२०-६६४९४९४९/६६४५५१००
३.	**नागपूर विभाग** नागपूर, भंडारा, चंद्रपूर, गोंदिया, गडचिरोली, वर्धा	**शुअरटेक (जूने अपोलो) हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर लि.,** १३-ए, बॅनर्जी मार्ग, धांतोली नागपूर-४४००१२	**डॉ. हेमा ढोबळे, वैद्यकीय अधिकक्षक** Mob.-९८९०१८८८५३ Hos.-०७१२-६६३६८६३/८००/८०१ Fax-०७१२-६६४०५४३
४.	**नाशिक विभाग** नाशिक, धुळे, जळगाव, नंदुरबार, अहमदनगर	**सुयश मेडीकल फाऊंडेशन प्रा.लि., सुयश हॉस्पिटल,** अहिल्याबाई होळकर मार्ग, महामार्ग बस स्टँड शेजारी, मुंबई नाका, नाशिक	**डॉ. हेमंत ओस्तवाल व्यवस्थापकीय संचालक** Mob.-९४२२२५८७७७ Hos.-०२५३-२३१८९९०/९१/९३
५.	**औरंगाबाद विभाग** औरंगाबाद, बीड, जालना, परभणी, नांदेड, हिंगोली, लातूर, उस्मानाबाद	**एम.जी. एम. मेडिकल सेंटर ॲण्ड रिसर्च इंस्टिटयूट** औरंगाबाद	**डॉ. अजय शिंदे रुग्णालय प्रशासक** Mob.-९८२३४९९९९४ Hos.-०२४०-६६०११००
६.	**अमरावती विभाग** अमरावती, यवतमाळ, अकोला, बुलढाणा, वाशिम	अमरावती विभागात कार्यरत संबंधित भावसे अधिकाऱ्यांनी त्यांना जवळ असणाऱ्या इतर महसूली विभागातील रुग्णालयांतून सदर वैद्यकीय तपासण्या करुन घ्याव्यात.	

प्रपत्र 'ब'

Annexure

From IV

[See Rule 3]

(Details of the medical tests to be conducted)

Date:

Name: Age: Years Sex: M/F

A. Investigations Reports

1.	**(a) Haemogram** (i) Haemoglobin (ii) TLC (Total Leukocyte Count) (iii) DLC (Differential Leukocyte Count) (a) Polymorphs (b) Lymphocytes (c) Eosinophils (d) Basophils (e) Monocytes (iv) Peripheral Smear **(b) Thyroid Profile** i) T3 ii) T4 iii) TSH **(c) Vit.B12 test** **(d) Vit. D3 test**
2.	**Urine Examination** (i) Colour (ii) Albumin (iii) Sugar (iv) Microscopic Exam **Stool routine**
3.	**Blood Sugar** (i) Fasting (ii) Post-Prandial
4.	**Lipid Profile** (i) Total Cholesterol (ii) HDL Cholesterol (High Density Lipoprotein Cholesterol) (iii) LDL Cholesterol (Low Density Lipoprotein Cholesterol) (iv) VLDL Cholesterol (Very Low Density Lipoprotein Cholesterol) (v) Triglycerides
5.	**Liver Function Tests** (i) S. Bilirubin (Total) (Serum Bilirubin) (ii) S. Bilirubin (Direct) (Serum Bilirubin) (iii) S.G.O.T. (Serum glutamic oxaloacetic transaminase) (iv) S.G.P.T. (Serum glutamic pyruvic transaminase) (v) Australia Antigen Test (Hepatitis B)

6.	**Kidney Function Tests** (i) Blood Urea (ii) S. Creatinine (Serum Creatinine) (iii) S. Uric Acid (Serum Uric Acid) (iv) Na+ (sodium) (v) K (Potassium) (vi) calcium (vii) Inorganic Phosphorus
7.	**(A) Cardiac Profile** (i) S.LDH (Serum Lactate dehydrogenase) (ii) CK-MB (Creatinine Kinase- muscle binding) (iii) S.CRP (Serum C- Reactive Protein) **(B) For Men** (v) PSA (Prostate Specific Antigen test) **(C) For Women** (vi) PAP SMEAR (Papanicolaou test)
8.	X-Ray-Chest PA View Report
9.	ECG Report (Electro Cardiogram Report)
10	USG Abdomen Report (Ultrasonography Abdomen Report)
11.	TMT Report (Treadmill test)/Stress test
12.	Mammography Report (Women)
13.	**Gynaecological Health Check Up** (i) Pelvic Examination (a) Local Examination (b) Per Vaginum (P/V) (c) Per Speculum (ii) Surgical Examination (iii) Breast Examination
14.	(i) Urological Examination (For Men Only) (ii) Rectal Examination (For Men Only)
15.	**Systemic Examination** (i) Resp. System (Respiratory System) PFT (Pulmonary Function test) (ii) CVS (Cardiovascular System) (iii) Abdomen (iv) CNS (Central Nervous System) (v) Locomotor System (vi) Dental Examination
16.	**Eye Examination** (i) Distant Vision (ii) Vision with Glasses (iii) Colour Vision (iv) Tonometry (v) Fundus Examination

17.	ENT (i) Oral Cavity (ii) Nose (iii) Throat (iv) Larynx	

B. Medical Report of the Officer

1.	Haemoglobin level of the officer	Normal/Low
2	Blood Sugar Level	Satisfactory/Normal/High/Low
3	Cholesterol level of the officer	Normal/High/Low
4	Liver functioning	Satisfactory/normal/dysfunctioning
5	Kidney Status	Normal/Both-one kidney not functional optimally
6	Cardiac Status	Normal/enlarged/blocked/not normal

C: Summary of Medical Report (only copy of this part is to be attached to PAR)

1.	Overall Health of the Officer	
2.	Any other remarks based on the health medical check up of the officer	
3.	Health profile grading	Excellent/Very Good/Good/Average

Date:

Signature of Medical Authority

Designation: